0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०४/१०/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६७/२०१२/जा.७१०, दिनांक ०६/१०/२०१२ व ०३/११/२०१२.

३) मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांचे दिनांक २५/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

४) मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. व मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांचे दिनांक २९/१०/२०१२ रोजीचे टपालामार्फत प्राप्त स्वतंत्र निवेदने.

५) मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. यांचेकडून दिनांक २१/१२/२०१२ रोजी प्राप्त कागदपत्रे.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६७/२०१२/जा.११४
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इंशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०५ /०२/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUM

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. नाडकर्णी मार्ग, वडाळा (पूर्व), मुंबई या ठिकाणी असलेल्या मे. जेठाभाई गोपालजीस व मे. केअरटेकर्स या दोन्ही गोदामास या कार्यालयाच्या अधिपत्याखालील फिरते पथकाने पथकाने दिनांक ३१/०७/२०१२ रोजी नमूद दोन्ही गोदामास भेट दिली असता, सदर गोदामात पिवळा वाटाणा या कडधान्याची मोठया प्रमाणात साठवणूक करुन ठेवली असल्याचे दिसून आल्याने पथकाने मे. जेठाभाई गोपालजीसचे उपस्थित भागीदार श्री. योगेश भानुशाली व मे. केअरटेकर्सचे उपस्थित ऑपरेशन इनचार्ज मंगेश शशीनाथ पेडणेकर यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी नमुद दोन्ही गोदामात भाडेतत्वावर कडधान्याची साठवणूक केली जात असल्याचे सांगीतले. तद्नंतर पथकाने पंचांसमवेत नमुद दोन्ही गोदामांची पहाणी केली असता, सद्य:स्थितीत मे. जेठाभाई गोपालजीस या गोदामात मे. ॲग्रीकोअर कमोडिटीज प्रा.लि. या कंपनीचे २१६३० बाचकी व मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीचे २१२ बाचकी प्रती ५० किलो प्रमाणे पिवळा वाटाणाचा

साठा साठवणुक केला असल्याचे पथकास आढळून आले. तसेच मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसची पहाणी केली असता, सदर वेअरहाऊसमध्ये मे. ॲग्रीकोअर कमोडिटीज प्रा.लि. या कंपनीचे २४५० बाचकी, मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीचे २५६७७ बाचकी तसेच मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचे ४०८० बाचकी पिवळे वाटाणाचा साठा साठवणुक केले असल्याचे पथकास आढळून आले. सदर दोन्ही गोदामाबाबत पथकाने उपस्थित इसमांकडे अधिक विचारणा केली असता, त्यांनी सदर गोदाम मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. यांचेकडून भाडेतत्वावर घेतले असल्याचे सांगितले. तद्नंतर उपस्थित इसमांकडे त्यांनी त्यांच्या गोदामात मोठया प्रमाणावर साठवणुक केलेल्या कडधान्य या अनुसुचित वस्तु असलेल्या साठयाबाबत पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यास सुचित केले असता, त्यांनी गोदामातील शिल्लक कडधान्याबाबत कोणतीही पुरावादर्शक कागदपत्रे सादर न केल्याने सदर गोदामातील साठवणूक केलेला मोठ्याप्रमाणावरील कडधान्याच्या साठ्याच्या मालकीबाबत तसेच साठवणुक केलेला साठा हा आयात केला आहे किंवा कसे ? या बाबत खातरजमा करण्याकरीता पुढील आदेशापर्यंत दोन्ही गोदामातील कडधान्याचा साठा पंचासमक्ष खालीलप्रमाणे जप्त करुन सुपूर्दनाम्याद्वारे मे. जेठाभाई गोपालजीसचे उपस्थित भागीदार श्री. योगेश भानुशाली व मे. केअरटेकर्सचे उपस्थित ऑपरेशन इनचार्ज मंगेश शशीनाथ पेडणेकर यांचेकडे एकूण रुपये ७,०२,६३,७००/- किंमतीचा मुद्देमाल सुपूर्द करुन जैसेथे स्थितीत ठेवण्याच्या सुचना देवून त्यांचा लेखी जबाब पंचांसमक्ष नोंदवीण्यात आला आहे.

**मे. जेठाभाई गोपालजीस वेअरहाऊस**

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | साठा (क्विंटल) | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | मे. ॲग्रीकोअर कमोडिटीज प्रा.लि. या कंपनीचा २१६३० बाचकी प्रती ५० किलो प्रमाणे पिवळे वाटाणाचा साठा | १०८१५ | २,८१,१९,०००/- |
| २ | मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या या कंपनीचा २१२ बाचकी प्रती ५० किलो प्रमाणे पिवळे वाटाणाचा साठा | १०६ | २,७५,६००/- |
| | | एकूण | २,८३,९४,६००/- |

**मे. केअरटेकर्स वेअरहाऊस**

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | साठा (क्विंटल) | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | मे. ॲग्रीकोअर कमोडिटीज प्रा.लि. या कंपनीचा २४५० बाचकी प्रती ५० किलो प्रमाणे पिवळे वाटाणाचा साठा | १२२५ | ३१,८५,०००/- |
| २ | मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीचा २५६७७ बाचकी प्रती ५० किलो प्रमाणे पिवळे वाटाणाचा साठा | १२८३८.५० | ३,३३,८०,१००/- |

CONTROLLER OF RATIONING ... HE ... M.

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचा ४०८० बाचकी प्रती ५० किलो प्रमाणे पिवळे वाटाणाचा साठा | २०४० | ५३,०४,०००/- |
| | | एकूण | ४,१८,६९,१००/- |

तद्नंतर नमुद दोन्ही गोदामात साठवणूक करण्यात आलेल्या कडधान्याच्या साठयाचे मालक म्हणून मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीच्या वतीने गोदामात साठवणूक केलेल्या कडधान्याबाबत दिनांक ०१/०८/२०१२ रोजीच्या निवेदनासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, सदर कंपनी ही स्वत: आयातदार असूनही त्यांनी स्थानीक बाजारपेठेतून ३००० मे. टन पिवळा वाटाणाचा साठा हा मे. इंडिसन ॲग्रो या आयातदार कंपनीकडून खरेदी केल्याचे नमुद केले आहे. तसेच मे. ॲग्रीकोअर या कंपनीने सादर केलेल्या निवेदनामध्ये त्यांनी मे. इंडिसन ॲग्रो या कंपनीकडून ८०००० बाचक्यांमधील ४००० मे. टन पिवळे वाटाण्याचा साठा खरेदी केल्याचे नमूद असून प्रत्यक्षात त्यांनी केवळ ३००० मे. टन पिवळा वाटाणा खरेदी केल्याचे बील सादर केले आहे. यावरुन मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा.लि. या कंपनीने मोघम स्वरुपाचे निवेदन सादर करुन या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन आले.

तसेच मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीने नमुद दोन्ही गोदामात साठवणुक करण्यात आलेल्या कडधान्याच्या साठयाचे मालक म्हणुन सादर केलेले निवेदनासोबतच्या कागदपत्रांचे उवलोकन करता, मे. ग्लेनकोअर या कंपनीने बील ऑफ एन्ट्री क्र. ३४५०४१९ व ३४५०४२० अन्वये दिनांक ०९/०५/२०११ रोजी अनुक्रमे १७५०० मे. टन व ९३००.०१८ मे. टन असे मिळून एकूण २६८००.१८ मे. टन पिवळ्या वाटाणाचा साठा आयात केल्याचे दिसून येते. सदर कंपनीने आयात केलेला एकत्रीत साठ्याबाबत दिनांक १३/०५/२०११ रोजीच्या पत्रान्वये मोघम स्वरुपात कळवीले असून तद्नंतर दिनांक २३/०५/२०११ व २२/०६/२०११ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या गोदामांच्या यादीत घटनास्थळी जप्त केलेल्या गोदामाचा उल्लेख नसून तद्नंतर दिनांक २४/११/२०११ रोजीच्या पत्रामध्ये सदर गोदामात ६३०० बाचके साठवणूक केल्याचे नमूद आहे. म्हणजेच दिनांक ०९/०५/२०११ रोजी आयात केलेल्या साठ्यापैकी दिनांक २४/११/२०११ रोजी सुमारे ६ महिन्या नंतर अल्प प्रमाणात म्हणजेच ६३०० बाचके नमूद गोदामात साठवणूक केल्याचे दर्शवीले आहे. तसेच माहे मे २०११ मध्ये आयात केलेला साठा हा जप्त केल्याच्या दिनांकापर्यंत म्हणजेच सुमारे १५ महिन्यापूर्वी आयात केलेला साठा हा पूर्णपणे विक्री न केल्याचे तसेच सदरचा साठा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून आले.

मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांनी सादर केलेल्या निवेदनासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांनी माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केलेला ५००० मे. टन पिवळे वाटाणाचा साठा हा मुंबई मधील विविध गोदामात साठवणुक केल्याचे व मे. केअरटेकर्स या गोदामात साठवणुक केलेला साठा हा आयात केल्यापैकीच-

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...BAI

असल्याचे नमुद करुन सदर साठा त्यांनी सदर गोदामात हा इतर ठिकाणी असलेल्या गोदामातुन स्थलांतरीत केल्याचे नमुद केले आहे. तथापी, माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केलेला साठा हा इतर गोदामात सुमारे ७ महिने साठवणुक असलेला साठा हा माहे जुलै २०१२ मध्ये मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये साठवणुक करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत साशंकता आहे.

उपरोक्त नमुद तिन्ही कंपन्यांनी सादर केलेले निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रे याबाबत अधिक खातरजमा करण्यासाठी तसेच सदर कंपन्यांच्या या कृत्यामूळे जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा स्थानीक बाजारपेठेत अनियमीत राहिल्यास कृत्रीम टंचाई निर्माण होऊन भाववाढ होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे सकृतदर्शनी दिसुन आल्याने तसेच वरील नमुद साठा मालक असलेल्या तिन्ही कंपन्यांनी टपालामार्फत सादर केलेल्या विविध कागदपत्रांचे अवलोकन करता, गोदामात सिलबंद असलेला साठा व कागदपत्रांवरील नमुद साठा यामध्ये आढळून आलेल्या गंभीर त्रुटींमुळे नमुद गोदामावरील तिन्ही कंपन्यांचा जप्त करण्यात आलेला पिवळे वाटाणा या कडधान्याचा साठा शासनजमा का करण्यात येऊ नये, याबाबत त्यांना त्यांचे लेखी अथवा मौखीक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयाच्या दक्षता शाखेमार्फत दिनांक ३१/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

तत्पुर्वी नमुद दोन्ही गोदामात साठवणुक असलेला पिवळे वाटाणा या कडधान्याचा साठा हा नाशवंत असल्याने सिलबंद करण्यात आलेल्या साठयास किड लागु नये म्हणुन साठयाचे धुरीकरण (Fumigation) ची परवानगी या कार्यालयाच्या वतीने दिनांक २४/०८/२०१२ रोजी निर्गमित केलेल्या पत्रान्वये देण्यात आली.

दिनांक ३१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. व मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या दोन्ही कंपन्याचे संचालक श्री. शाम दोशी यांनी उपस्थित राहुन दोन्ही कंपन्यांचे स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तसेच सदर सुनावणीस त्यांच्या समवेत सर्वश्री सौरभ भरतीया, श्रीनिवास बादेती व श्रीमती शर्मीला गायकवाड हे अधिकारीही उपस्थित राहीले. तसेच मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १७/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १७/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस, मे. केअरटेकर्सचे ऑपरेशन इंनचार्ज श्री. मंगेश शशिनाथ पेडणेकर व मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स या कंपनीच्या वतीने व्यवस्थापक ऑगस्टिनो फर्नांडीस यांनी उपस्थित राहुन त्यांच्या कंपनीच्या वतीने लेखी निवेदन सादर केले.

तद्नंतर दिनांक २८/०९/२०१२ रोजीच्या आदेशान्वये मे. जेठाभाई गोपालजीस व मे. केअरटेकर्स वेअरहाऊसिंग यांनी केलेल्या विनंतीनुसार दोन्ही वेअरहाऊस सिलमुक्त करुन यापूर्वीच जप्त करण्यात आलेला व त्यांच्या सुपूर्द करण्यात आला संपूर्ण कडधान्याचा साठा हा त्यांनी पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत जतन करुन

ठेवण्याचे तसेच सदरचा जप्त साठा हा नाशवंत असल्याने सदर साठ्याची वेळोवेळी धुरीकरण (Fumigation) करुन घेण्याचे आदेश पारीत करण्यात आले.

मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीचे संचालक श्री शाम दोशी यांनी केलेल्या खुलाशात, मे. इंडीसन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराकडून ४००० मे. टन साठा खरेदी करुन त्यापैकी १००० मे. टन साठा त्यांनी डॉकवरुन विक्री केल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने खरेदी केलेल्या ४००० मे. टन साठयाचे खरेदी बिल सादर करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी सादर केलेल्या निवेदनासोबत मे. इंडीसन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराकडून खरेदी केलेल्या साठयाचे खरेदी बिल सादर केले नसुन त्यांनी नमुद कंपनीचे दिनांक १८/०७/२०१२ रोजीचे ३००० मे. टन पिवळे वाटाणाचा साठयाचे प्रोफार्मा इन्व्हाईस सादर केले आहे. यावरुन मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीचे संचालक श्री शाम दोशी हे केवळ या कार्यालयाने जप्त केलेल्या साठयाच्या पुराव्यादाखल कमी परीमाणाचे प्रोफार्मा इन्व्हाईस सादर करुन सोपस्कार पूर्ण करुन या कार्यालयाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराने बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७४७ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये १२५० मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७९१ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये २००० मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७५३ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये २००० मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७६५ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये १००० मे. टन व बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७९८ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये २००० मे. टन असे मिळुन एकुण ८२५० मे. टन पिवळे वाटाणाचा साठा आयात केल्याचे तसेच सदर साठयाचे दिनांक २५/०७/२०१२ रोजीच्या स्वतंत्र सुचनापत्रान्वये त्यांनी दिनांक २७/०७/२०१२ रोजी या कार्यालयास अवगंत केल्याचे दिसुन येते. तथापी, मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. या कंपनीने केवळ साठा आयात केल्याची माहिती या कार्यालयास सादर केली असून सदरचा साठा त्यांनी कोणत्या गोदामात साठवणूक केला अथवा सदर साठ्यापैकी त्यांनी ४००० मे. टन साठा हा मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीस विकल्याचे तपशिल सादर केलेले नाही.

मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. यांनी खरेदी केलेल्या साठा संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सिलबंद असलेला पिवळे वाटाणाचा साठा त्यांनी मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराकडून ३००० मे. टन खरेदी केल्याबाबत नमूद केले. तथापी, दिनांक २०/०७/२०१२ व दिनांक २३/०७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास त्यांनी सदरचा साठा हा मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. या कंपनीकडून खरेदी केल्याची बाब नमूद केली नाही. ही आश्चर्यजनक बाब आहे.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
BAI

मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीचा मे. जेठाभाई गोपालजीस या गोदामात २१२ बाचकी तसेच मे. केअरटेकर्स या गोदामात २५६७७ बाचकी पिवळे वाटाणाचा साठा हा सिलबंद आहे. नमुद कंपनीचे संचालक श्री शाम दोशी यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, त्यांची कंपनी कडधान्य या शेतमालाच्या वस्तुचा आयात आणि व्यापार करीत असुन दिनांक १३/०५/२०११ रोजी उपनियंत्रक शिधावाटप यांना सादर केलेल्या पत्रामध्ये ते बिल ऑफ एन्ट्री क्रमांक ३४५०४१९ व ३४५०४२० अन्वये २६८००.१८ मे. टन साठा एमव्ही नॉर्ड इलन या व्हेसलद्वारे आयात करणार असल्याचे कळविले असल्याचे सांगितले. दिनांक २४/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये एन शेड रे रोड येथील गोदामातुन ८८०० बाचक्यांमधील साठा स्थलांतरीत करणार असल्याचे व त्यापैकी ६३०० बाचके नमुद गोदामावर व २५०० बाचके शिवडी येथील गोदामात साठवणुक करणार असल्याचे कळविले आहे. सदर ६३०० बाचक्यांमधील साठयाची विक्री ०७/०६/२०१२ रोजी पुर्ण झाली असल्याचे सांगुन जप्त करण्यात आलेला २१२ बाचक्यांमधील साठा हा त्यापैकी नाही. सदरचा साठा हा दिनांक ०१/०२/२०१२ रोजी एमव्ही लॉर्ड अली या व्हेसलमधील १८० बाचके तसेच दिनांक १९/१०/२०११ रोजी एमव्ही अलबरेला या व्हेसलमधील ३२ बाचके असे मिळुन २१२ बाचक्यांमधील साठा असल्याचे सांगितले. दिनांक ०३/०७/२०१२ रोजी सादर केलेल्या माहे जुनच्या मासीक विवरणपत्रामध्ये मे. जेठाभाई गोपालजीस या वेअरहाऊसमध्ये १६६७५ बाचके व मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये ६४०९७ बाचके असे मिळून एकूण ८०७७२ बाचके पिवळे वाटाणाचा साठा नमूद दोन्ही गोदामात साठवणूक असल्याचे दिसून येते. तथापी, प्रत्यक्षात घटनास्थळी असलेल्या मे. जेठाभाई गोपालजीस या वेअरहाऊसमध्ये २१२ बाचके व मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये २५६७७ बाचके असे मिळून एकूण २५८८९ बाचके पिवळे वाटाणाचा साठा जप्त आहे. म्हणजेच मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित संचालक हे जप्त असलेल्या साठ्याबाबत काहीच भाष्य करीत नसून, ज्या शिपमेंटमधील साठ्याची विक्री पूर्ण झाली आहे, केवळ त्याचे तपशिल सादर करुन या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.

मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचा मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये ४०८० बाचकी पिवळे वाटाणाचा साठा सिलबंद आहे. नमूद कंपनीचे व्यवस्थापक श्री ऑगस्टिनो फर्नांडीस यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीने मे. गोदरेज इंडस्ट्रिज लि. वडाळा पूर्व, मुंबई-३७ येथील गोदामात ४०८० बाचक्यांमधील पिवळ्या वाटाण्याच्या साठयाबाबत त्यांनी सीडब्ल्युसी वेअरहाऊस येथून ६००० बाचक्यांमधील साठा हा मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये माहे जुन २०१२ या महिन्यात स्थलांतरीत केले असल्याचे नमूद केले आहे. मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांनी सादर केलेल्या निवेदनासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांनी माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केलेला ५००० मे. टन पिवळे वाटाणाचा साठा हा मुंबई मधील विविध

CONTROLLER OF RATIONING ... HEA ... M

गोदामात साठवणुक केल्याचे दिसून येते. तथापी, माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केलेला साठा हा इतर गोदामात सुमारे ७ महिने साठवणुक असलेला साठा हा माहे जुलै २०१२ मध्ये मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये साठवणुक करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत त्यांनी काहीच भाष्य केले नाही. ही आश्चर्यजनक बाब आहे.

अशाप्रकारे मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. नाडकर्णी मार्ग, वडाळा (पूर्व), मुंबई या ठिकाणी असलेल्या मे. जेठाभाई गोपालजीस व मे. केअरटेकर्स या दोन्ही गोदामात मोठया प्रमाणावर साठवणुक केलेला विनापरवाना कडधान्याचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने असल्याचे दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने पुढील तपासणीचे अधिन राहून उपरोक्त नमूद जीवनावश्यक वस्तूंचा यापूर्वीच जप्त असलेला साठा घटनास्थळीच जैसे थे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याचे दिनांक २८/०९/२०१२ रोजीच्या आदेशान्वये देण्यात येऊन नमूद दोन्ही वेअरहाऊस सिलमुक्त करण्यात आले आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील कडधान्यांचा साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ३०/१०/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ३०/१०/२०१२ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. तथापी, सदर सुनावणीच्या दिवशी मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. चे लिगल व कंपलायन्स मॅनेजर श्रीम. शर्मिला गायकवाड व मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. चे ट्रेडर मॅनेजर श्री. सौरभ भारतीय हे कंपनीचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले व त्यांनी टपालामार्फत कंपनीचे लेखी निवेदन सादर केल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीच्या दिवशी मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. चे एक्झीक्युटीव मॅनेजर श्री. ॲगस्टीनो फर्नांडिस हे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले व कंपनीचे वाचावे क्र. ३ अन्वये टपालामार्फत दिलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीच्या दिवशी मे. जेठाभाई गोपालजीस या वेअरहाऊसचे भागीदार श्री. योगेश भानुशाली व मे. केअरटेकर्स वेअरहाऊसचे ऑपरेशन इन्चार्ज श्री. मंगेश पेंडणेकर हे उपस्थित राहिले. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील सुनावणी दिनांक २०/११/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीच्या वतीने श्रीम. शर्मिला गायकवाड, मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. च्या वतीने श्री. सौरभ भारतीय व मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

लि. च्या वतीने श्री. ॲगस्टीनो फर्नांडिस यांनी उपस्थित राहून यापूर्वी कंपनीचे लेखी निवेदन सादर केल्याचे सांगितले. सदर सुनावणीस मे. जेठाभाई गोपालजीस या वेअरहाऊसचे भागीदार श्री. योगेश भानुशाली व मे. केअरटेकर्स वेअरहाऊसच्या वतीने प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून श्री. कैलाश पलन हे उपस्थित राहिले. सदर सुनावणीस मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. च्या उपस्थित प्रतिनिधनी यांनी साठ्यासंबंधी परिपूर्ण अहवाल दोन दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले.

तद्नंतर मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. यांनी वाचावे क्र.५ अन्वये कागदपत्रे सादर केली.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांचे दिनांक २५/१०/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, सेंट्रल वेअरहाऊस कॉर्पोरेशन या ठिकाणी पाण्याची गळती होत असल्याने पावसाळा सुरु होण्याच्या आधी दिनांक १५/०६/२०१२ रोजी सदरचा साठा मे. नरेंद्र फॉरवर्डस् प्रा.लि. या कस्टम हाऊस एजन्टमार्फत स्थलातंरीत करण्यात आले. सदर बाबत दिनांक ०१/०६/२०१२ ते ३०/०६/२०१२ या कालावधीच्या स्टॉक स्टेटमेंट अन्वये दिनांक ०३/०७/२०१२ रोजी कळविण्यात आले आहे. कारणे दाखवा नोटीसमध्ये ६००० बाचक्यांमधील ५००० मे. टन पिवळे वाटाणा माहे डिसेंबर, २०११ मध्ये आवक झाल्याचे व ते विविधि गोदामांमध्ये साठवणूक केल्याचे नमूद आहे. तसेच सदरचा साठा मागील ७ महिन्यांपासून साठवणूक केल्याचे नमूद आहे. माहे डिसेंबर, २०११ मध्ये ५००० मे. टन साठ्यांची आवक झाली असून त्यापैकी १३२८५ बाचक्यांमधील ६६४.२५० मे. टन साठा हा माहे जुन, २०१२ मध्ये प्राथमिक शिल्लक म्हणून दर्शविला आहे. उर्वरीत साठा हा माहे डिसेंबर, २०११ ते मे, २०१२ या कालावधीत विक्री करण्यात आलेला आहे. दिनांक २७/०९/२०११ रोजीच्या अधिसुचनान्वये आयात केलेल्या कडधान्यावर साठा मर्यादा नसून त्याकरिता साठवणूक कालावधी नमूद नाही. आजमितीस गोदरेज इंडस्ट्रिज गोडावूनमध्ये ४०८० बाचक्यांमधील २०४ मे. टन साठा शिल्लक असून सदर साठ्यासंबंधी आवश्यक कागदपत्रे सोबत जोडण्यात आली असल्याने त्याची पडताळणी करुन साठा मुक्त करण्याची विनंती केली.

मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. यांचे दिनांक २९/१०/२०१२ रोजीचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक २०/०७/२०१२ व २३/०७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी ३००० मे. टन कॅनेडीयन येलोपिस आयात करुन तो गोदामाच्या उपलब्धतेनुसार साठवणुक करणार असल्याबाबत आपल्या कार्यालयास अवगत करण्यात आले होते. तसेच व्यवसायाच्या संबंधात वेळोवेळी त्यांनी माहिती दिली असुन याबाबत त्यांचे संचालक श्री. शाम दोशी यांनी कधीही आपल्या कार्यालयाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केलेला नाही. दिनांक ३१/१०/२०१२ रोजीच्या पत्रान्वये

CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MI

त्यापैकी १००० मे. टन साठा हा डॉकमधुन विक्री केला असल्याने त्या साठयाची साठवणुक करण्याची आवश्यकता नसल्याने त्याचे तपशिल सादर केले नाही. साठा आयात केल्याबाबत आयातदार मे. इंडियन् ॲग्रो फुडस् लि. यांनी अवगत केले असल्याने मे. ॲग्रिकोर या त्यांच्या कंपनीस पुन्हा अवगत करणे गरजेचे नाही. तरीही ॲग्रिकोर या कंपनीने मे. इंडियन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराकडून खरेदी केलेल्या साठयापैकी साठवणुक करीत असल्याबाबत अवगत केले आहे. डॉकमधुन विक्री केलेल्या १००० मे. टन साठा हा सद्यस्थितीत त्यांचा नसल्याने व तो साठा साठवणुक केले नसल्याने त्याचे तपशिल देण्यात आले नाही. उर्वरीत साठा हा त्यांच्या कंपनीच्या ताब्यात असल्याने त्याचा लेखाजोगा व साठवणुकीचे तपशिल आपल्या कार्यालयात देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या कंपनीचा आपल्या कार्यालयाचे दिशाभुल करण्याचे कोणतेही उद्देश व कारण नसल्याचे नमुद केले. प्रचलीत पध्दतीनुसार साठा आयात असल्याबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर केले आहे. दिनांक ३१/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस कंपनीच्या वतीने उपस्थित प्रतिनिधींसमवेत आवश्यकतेनुसार खरेदी व विक्री बिलांचे इन्व्हाईस होते. परंतु त्याबाबत सादर करण्याच्या सुचना नसल्याने तसेच ते मोठया प्रमाणात असल्याने त्यांनी सादर केले नाही. तरी निवेदनासोबत संपूर्ण ४००० मे. टनाचे खरेदी बिल आणि विक्री बिले व डॉकमधुन थेट विक्री केल्याचे तपशिल विवरण पत्रासह सादर करीत आहोत. दिनांक ३१/०८/२०१२ रोजीच्या निवेदनानुसार ते पुन्हा विनंती करीत आहेत की, त्यांचा जप्त साठा तात्काळ मुक्त करण्यात यावा. तसेच दिनांक ०१/०८/२०१२ व त्यापूर्वी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सिध्द होत आहे की, त्यांचा २४०८० बाचक्यांमधील जेठाभाई गोपालजीस वेअरहाऊसमधील साठा हा आयात केला असल्याने त्यावर जीवनावश्यक वस्तु कायद्याच्या तरतुदी लागु होत नाही. त्यामुळे जप्त साठा मुक्त करण्याची विनंती केली. जीवनावश्यक वस्तुं कायदा, १९५५ नुसार अंमलात असलेल्या आदेशाच्या तरतुदींनुसार आयात केलेल्या कडधान्याच्या साठयावर साठा निर्बंध लागु नसल्याने व जप्त साठा हा नाशवंत असल्याने त्यांना परत करण्यात यावा. तसे न झाल्यास त्यांना भारी आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. निवेदनासोबत ४००० मे. टन इंडीसन यांच्याकडून खरेदी केल्याचे तपशिल सादर करण्यात येत आहेत. आपणास आवश्यकता भासल्यास सुनावणीमध्ये त्याचे तपशिल सादर करण्यात येईल.

मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. यांचे दिनांक २९/१०/२०१२ रोजीचे टपालामार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक १७/०८/२०१२ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने त्यांनी दिनांक ३१/०८/२०१२ रोजी सादर केलेल्या निवेदनाबाबत ते पुन्हा नमुद करु इच्छितात की, दिनांक ०३/०६/२०१२ रोजी त्यांनी सादर केलेल्या मासिक विवरणपत्राची पोहच उपलब्ध असुन त्याबाबत दिनांक ०६/१०/२०१२ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये नमुद आहे. दिनांक ०३/०६/२०१२ रोजीच्या मासिक विवरणपत्रामध्ये ८०७७२ बाचक्यांमधील कडधान्य हे गोदरेज जेठाभाई गोपालजी वेअरहाऊस आणि गोदरेज केअरटेकर्स या दोन्ही वेअरहाऊसमध्ये साठवणुक केले असल्याची

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE

बाब नमुद आहे. दिनांक १३/०५/२०११ च्या सुमारास त्यांनी नॉर्डइलान या व्हेसलमधुन २६८००.०१८ मे. टन कॅनेडियन येलोपिस आयात केल्याचे नमुद आहे. सदरचा आयात केलेला साठा प्राप्त झाल्यानंतर विविध वेअरहाऊसमध्ये साठावणुक केला आहे. त्यापैकी, काही साठा विक्री करुन उर्वरीत शिल्लक साठा मुंबईतील विविध वेअरहाऊसेसमध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार साठवणुक केल्याची बाब त्यांनी वेळोवेळी उपनियंत्रक शिधावाटप यांना अवगत केली आहे. सदर साठा प्राप्त झाल्यानंतर त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप यांना विविध वेअरहाऊसमध्ये साठवणुक केले असल्याबाबत दिनांक २२/०६/२०११ रोजीच्या पत्रान्वये अवगत केले आहे. तद्नंतर दिनांक २४/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये सदर साठयापैकी एन शेड ग्रेन डेपो रे रोड येथुन जेठाभाई गोपालजीस गोदरेज इंडस्ट्रिज लि., नाडकर्णी मार्ग या वेअरहाऊसमध्ये स्थलांतरीत केले असल्याचे उपनियंत्रक शिधावाटप यांना अवगत केले असुन सदर साठंयाचे विवरणपत्र निवेदनासोबत जोडले आहे. दिनांक २५/१०/२०११ रोजी अलबरेला या व्हेसलमधुन ४९९४.६३६ मे. टन फ्रेन्च येलोपिस आयात केला आहे. त्यानुसार सदरचा साठा प्राप्त झाल्यानंतर त्यापैकी काही साठा विक्री करुन उर्वरीत साठा विविध वेअरहाऊसमध्ये स्थलांतरीत केला आहे. सदरबाबत त्यांनी दिनांक ०२/११/२०११ आणि २४/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये उपनियंत्रक शिधावाटप यांना कळविण्यात आले असुन त्यामध्ये गोदरेज जेठाभाई गोपालजी वेअरहाऊस आणि इतर वेअरहाऊसमधील साठवणुकीचे तपशिल नमुद असुन ते सोबत जोडण्यात आले आहे. दिनांक १२/०१/२०१२ च्या सुमारास त्यांनी आयकन जेरम या व्हेसलमधुन १५६१८.५१ मे. टन ऑस्ट्रेलियन चिकपिसचा साठा आयात केला आहे. सदर साठा प्राप्त झाल्यानंतर त्यापैकी काही साठा विक्री करुन उर्वरीत साठा विविध वेअरहाऊसेसमध्ये स्थलांतरीत केला आहे. याबाबत त्यांनी दिनांक १९/०१/२०१२ आणि ०६/०२/२०१२ रोजीच्या पत्रान्वये उपनियंत्रक शिधावाटप यांना त्यापैकी गोदरेज जेठाभाई गोपालजी वेअरहाऊसमध्ये साठवणुक असल्याची बाब नमुद आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. दिनांक ३०/०१/२०१२ च्या सुमारास लॉर्डअली या व्हेसलमधुन २४९९२.९० मे. टन रशियन येलोपिसचा साठा आयात केला आहे. सदर साठा प्राप्त झाल्यानंतर त्यापैकी काही साठा विक्री करुन उर्वरीत साठा विविध वेअरहाऊसेसमध्ये स्थलांतरीत केला आहे. याबाबत त्यांनी दिनांक ०६/०२/२०१२ आणि ०५/०३/२०१२ रोजीच्या पत्रान्वये उपनियंत्रक शिधावाटप यांना त्यापैकी गोदरेज जेठाभाई गोपालजी वेअरहाऊस आणि गोदरेज केअरटेकर वेअरहाऊसमध्ये साठवणुक असल्याची बाब नमुद आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. सदरचे वेअरहाऊसेस सिल करतांना २५५ बाचक्यांमधील कडधान्य हे गोदरेज जेठाभाई गोपालजी वेअरहाऊसमध्ये साठवणुक असल्याची बाब त्यांनी दिनांक ३१/०८/२०१२ रोजीच्या निवेदनामध्ये नमुद केली आहे आणि ८०७७२ बाचक्यांपैकी २५६७७ बाचक्यांमधील साठा हा गोदरेज केअरटेकर्स वेअरहाऊस येथे साठवणुक असल्याची बाब त्यांनी दिनांक ०३/०६/२०१२ रोजीच्या साठा विवरणपत्रामध्ये नमुद केली आहे. त्यापैकी ५२२४० बाचक्यांमधील

CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

साठा हा ०३/०६/२०१२ ते ३१/०८/२०१२ या कालावधीत विक्री केले असुन त्याचे विवरणपत्र सोबत जोडण्यात आले आहे. दिनांक १७/०८/२०१२ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये गोदरेज जेठाभाई वेअरहाऊस येथे साठवणुक असलेला २१२ बाचक्यांमधील आयात साठा हा गेल्या १५ महिण्यांपासुन जसाच तसा साठवणुक असल्याचे नमुद आहे. परंतु सदरचा साठा विक्री न झाल्याने तो साठवणुक केल्याची बाब त्यांनी दिनांक ३१/०८/२०१२ रोजी लेखी तसेच मौखिकरित्या अवगत केले आहे. कारणे दाखवा नोटीसमध्ये २५९३२ बाचक्यांमधील साठयाची नोंद चुकीची असुन २५८८९ बाचक्यांमधील साठा हा गोदरेज केअरटेकर वेअरहाऊसमध्ये साठवणुक केला आहे. सदरची बाब दिनांक १७/०८/२०१२ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसमध्ये नमुद नाही. सदर बाब नमुद नसतांनाही त्यांनी २५८८९ बाचक्यांबाबत पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली असुन तो तात्काळ मुक्त होईल असे अपेक्षीत आहे. स्पेसीफाईड फुडस्टफ ऑर्डर, २००२ अन्वये आयात केलेल्या साठयांवर निर्बंध नसुन सदरबाबत दिनांक २७/०९/२०११ रोजीच्या तसेच दिनांक २७/०९/२०११ रोजीच्या अधिसुचनान्वये दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत अंमलात आहे. त्यामुळे जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदी आयात साठयावर लागु होत नसल्याने त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती केली. सदरचा साठा हा नाशवंत असल्याने व तो मुक्त न झाल्यास त्यांना भारी आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर साठयाबाबत अधिक खुलाशाची गरज पडल्यास सुनावणीमध्ये सादर करण्यात येईल असे नमुद केले आहे.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीमध्ये मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. व मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनींच्या वतीने उपस्थित प्रतिनिधींनी जप्त साठयासंबंधी योग्य पुरावादर्शक कागदपत्रांसह परिपुर्ण अहवाल दोन दिवसात सादर करणार असल्याचे सांगितले. तथापी, सदरचे आवश्यक कागदपत्रे फक्त मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनींच्या वतीने दिनांक २१/१२/२०१२ रोजी या कार्यालयास सादर करण्यात आले. परंतु सदर जीवनावश्यक वस्तुंचा साठा हा नाशवंत असल्याने सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ३१/०७/२०१२ रोजी या कार्यालयाच्या अधिपत्याखालील फिरते पथकाने मे. गोदरेज इंडस्ट्रीज लि. नाडकर्णी मार्ग, वडाळा (पूर्व), मुंबई या ठिकाणी असलेल्या मे. जेठाभाई गोपालजीस व मे. केअरटेकर्स या दोन्ही गोदामास भेट दिली असता, सदर गोदामात पिवळा वाटाणा या कडधान्याची मोठया प्रमाणात

साठवणूक करुन ठेवला असल्याचे दिसून आल्याने पथकाने मे. जेठाभाई गोपालजीसचे उपस्थित भागीदार श्री. योगेश भानुशाली व मे. केअरटेकर्सचे उपस्थित ऑपरेशन इनचार्ज मंगेश शशीनाथ पेडणेकर यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी नमुद दोन्ही गोदामात भाडेतत्वावर कडधान्याची साठवणूक केली जात असल्याचे सांगीतले. तद्नंतर पथकाने पंचांसमवेत नमुद दोन्ही गोदामांची पहाणी केली असता, सद्य:स्थितीत मे. जेठाभाई गोपालजीस या गोदामात मे. ॲग्रीकोअर कमोडिटीज प्रा.लि. या कंपनींचे २१६३० बाचकी व मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीचे २१२ बाचकी प्रती ५० किलो प्रमाणे पिवळा वाटाणाचा साठा साठवणुक केला असल्याचे पथकास आढळून आले. तसेच मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसची पहाणी केली असता, सदर वेअरहाऊसमध्ये मे. ॲग्रीकोअर कमोडिटीज प्रा.लि. या कंपनीचे २४५० बाचकी, मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीचे २५६७७ बाचकी तसेच मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचे ४०८० बाचकी पिवळे वाटाणाचा साठा साठवणुक केले असल्याचे पथकास आढळून आले. तद्नंतर उपस्थित इसमांकडे त्यांनी त्यांच्या गोदामात मोठया प्रमाणावर साठवणुक केलेल्या कडधान्य या अनुसुचित वस्तु असलेल्या साठयाबाबत पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यास सुचित केले असता, त्यांनी गोदामातील शिल्लक कडधान्याबाबत कोणतीही पुरावादर्शक कागदपत्रे सादर न केल्याने सदर गोदामातील साठवणूक केलेला मोठ्याप्रमाणावरील कडधान्याच्या साठ्याच्या मालकीबाबत तसेच साठवणुक केलेला साठा हा आयात केला आहे किंवा कसे ? याबाबत खातरजमा करण्याकरीता पुढील आदेशापर्यंत दोन्ही गोदामातील कडधान्याचा साठा पंचासमक्ष जप्त करुन मे. जेठाभाई गोपालजीसचे उपस्थित भागीदार श्री. योगेश भानुशाली व मे. केअरटेकर्सचे उपस्थित ऑपरेशन इनचार्ज मंगेश शशीनाथ पेडणेकर यांचा लेखी जबाब पंचांसमक्ष नोंदवीण्यात आला. सदर दोन्ही इसमांकडे सुपूर्दनाम्याद्वारे एकूण रुपये ७,०२,६३,७००/- किंमतीचा मुद्देमाल सुपूर्द करुन जैसेथे स्थितीत ठेवण्याच्या सुचना दिल्या.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध होते. तद्नंतर केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

तथापी, "Central Government or State Government may direct the Importers to declare the receipts of stocks of these commodities and stocks retained by them" असे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या

CONTROLLER OF RATIONING ... HEA ... ML

डाळींसाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या डाळीची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या डाळीचा तपशिल, विक्री केलेल्या डाळीचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात डाळीची विक्री करताना पावतीवर " Imported pulses " असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या डाळीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे नमूद आहे.

मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. ही कंपनी स्वत: आयातदार असूनही त्यांनी स्थानीक बाजारपेठेतून ३००० मे. टन पिवळा वाटाण्याचा साठा खरेदी केल्याची बीले सादर केली आहेत. तथापी, मे. इंडिसन ॲग्रो या आयातदार कंपनीकडून ८०००० बाचक्यांमधील ४००० मे. टन पिवळे वाटाण्याचा साठा खरेदी केला असून प्रत्यक्षात त्यांनी केवळ ३००० मे. टन पिवळा वाटाणा खरेदी केल्याचे बील सादर केले आहे. तद्नंतर मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीचे संचालक श्री. शाम दोशी यांनी केलेल्या खुलाशात, मे. इंडीसन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराकडून ४००० मे. टन साठा खरेदी करुन त्यापैकी १००० मे. टन साठा त्यांनी डॉकवरुन विक्री केल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने खरेदी केलेल्या ४००० मे. टन साठयाचे खरेदी बिल सादर करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी सादर केलेल्या निवेदनासोबत मे. इंडीसन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराकडून खरेदी केलेल्या साठयाचे खरेदी बिल सादर केले नसुन त्यांनी नमुद कंपनीचे दिनांक १८/०७/२०१२ रोजीचे ३००० मे. टन पिवळे वाटाणाचा साठयाचे केवळ प्रोफार्मा इन्व्हाईस सादर केले आहे. म्हणजेच मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीचे संचालक श्री. शाम दोशी हे केवळ या कार्यालयाने जप्त केलेल्या साठयाच्या पुराव्यादाखल कमी परीमाणाचे प्रोफार्मा इन्व्हाईस सादर करुन सोपस्कार पूर्ण केल्याचे दिसून येते. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराने बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७४७ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये १२५० मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७९१ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये २००० मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७५३ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये २००० मे. टन, बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७६५ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये १००० मे. टन व बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३४५७९८ दिनांक १०/०७/२०१२ अन्वये २००० मे. टन असे मिळुन एकुण ८२५० मे. टन पिवळे वाटाणाचा साठा आयात केल्याचे तसेच सदर साठयाचे दिनांक २५/०७/२०१२ रोजीच्या

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

स्वतंत्र सुचनापत्रान्वये त्यांनी दिनांक २७/०७/२०१२ रोजी या कार्यालयास अवगत केल्याचे दिसुन येते. तथापी, मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. या कंपनीने केवळ साठा आयात केल्याची माहिती या कार्यालयास सादर केली असून सदरचा साठा त्यांनी कोणत्या गोदामात साठवणूक केला अथवा सदर साठ्यापैकी त्यांनी ४००० मे. टन साठा हा मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीस विकल्याचे तपशिल सादर केलेले नाही. मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. यांनी खरेदी केलेल्या साठा संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सिलबंद असलेला पिवळे वाटाणाचा साठा त्यांनी मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराकडून ३००० मे. टन खरेदी केल्याबाबत नमूद केले. तथापी, दिनांक २०/०७/२०१२ व दिनांक २३/०७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास त्यांनी सदरचा साठा हा मे. इंडिसन ॲग्रो फुडस् लि. या कंपनीकडून खरेदी केल्याची बाब नमूद केली नाही. ही आश्चर्यजनक बाब आहे. तथापी, मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. यांचे दिनांक २९/१०/२०१२ रोजीच्या निवेदनात, दिनांक २०/०७/२०१२ व २३/०७/२०१२ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी ३००० मे. टन कॅनेडीयन येलोपिस आयात करुन तो गोदामाच्या उपलब्धतेनुसार साठवणुक करणार असल्याबाबत अवगत करण्यात आल्याचे सांगुन व्यवसायाच्या संबंधात वेळोवेळी त्यांनी माहिती दिली असल्याचे सांगितले. तसेच त्यापैकी १००० मे. टन साठा हा डॉकमधुन विक्री केला असल्याने त्या साठयाची साठवणुक करण्याची आवश्यकता नसल्याने त्याचे तपशिल सादर केला नसल्याचे नमुद करुन सदरचा साठा आयात केल्याबाबत आयातदार मे. इंडियन ॲग्रो फुडस् लि. यांनी अवगत केले असल्याने मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या त्यांच्या कंपनीस पुन्हा अवगत करणे गरजेचे नाही असे सांगीतले. तरीही मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीने मे. इंडियन ॲग्रो फुडस् लि. या आयातदाराकडून खरेदी केलेल्या साठयापैकी साठवणुक करीत असल्याबाबत अवगत केले असल्याचे सांगीतले. प्रस्तुत प्रकरणी, मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीने सुनावणीच्या वेळी निवेदनासोबत संपूर्ण ४००० मे. टनाचे खरेदी बिल आणि विक्री बिले व डॉकमधुन थेट विक्री केल्याचे तपशिल विवरणपत्रासह सादर केले आहे. मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीचा आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगून सदर साठ्याची नियमीतपणे विक्री करुन सद्य:स्थितीत नमुद गोदामावर त्यापैकीच शिल्लक असलेला साठा हा जप्त करण्यात आलेला असल्याचे सांगीतले आहे. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन नमुद दोन्ही वेअरहाऊसमध्ये जप्त असलेला पिवळा वाटाणा या कडधान्याचा साठा हा वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीने नमुद दोन्ही गोदामात साठवणुक करण्यात आलेल्या कडधान्याच्या साठयाचे मालक म्हणुन सादर केलेले निवेदनासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन करता, मे.

CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

ग्लेनकोअर या कंपनीने बील ऑफ एन्ट्री क्र. ३४५०४१९ व ३४५०४२० अन्वये दिनांक ०९/०५/२०११ रोजी अनुक्रमे १७५०० मे. टन व ९३००.०१८ मे. टन असे मिळून एकूण २६८००.१८ मे. टन पिवळ्या वाटाणाचा साठा आयात केल्याचे दिसून येते. सदर कंपनीने आयात केलेला एकत्रीत साठ्याबाबत दिनांक १३/०५/२०११ रोजीच्या पत्रान्वये मोघम स्वरुपात कळवीले असून तद्नंतर दिनांक २३/०५/२०११ व २२/०६/२०११ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या गोदामांच्या यादीत घटनास्थळी जप्त केलेल्या गोदामाचा उल्लेख नसून तद्नंतर दिनांक २४/११/२०११ रोजीच्या पत्रामध्ये सदर गोदामात ६३०० बाचके साठवणूक केल्याचे नमूद आहे. म्हणजेच दिनांक ०९/०५/२०११ रोजी आयात केलेल्या साठ्यापैकी दिनांक २४/११/२०११ रोजी सुमारे ६ महिन्यानंतर अल्प प्रमाणात म्हणजेच ६३०० बाचके नमूद गोदामात साठवणूक केल्याचे दर्शविले आहे. तसेच माहे मे २०११ मध्ये आयात केलेला साठा हा जप्त केल्याच्या दिनांकापर्यंत म्हणजेच सुमारे १५ महिन्यापूर्वी आयात केलेला साठा हा पूर्णपणे विक्री न केल्याचे तसेच सदरचा साठा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीचा मे. जेठाभाई गोपालजीस या गोदामात २१२ बाचकी तसेच मे. केअरटेकर्स या गोदामात २५६७७ बाचकी पिवळे वाटाणाचा साठा हा सिलबंद आहे. नमुद कंपनीचे संचालक श्री. शाम दोशी यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात, दिनांक १३/०५/२०११ रोजी उपनियंत्रक शिधावाटप यांना सादर केलेल्या पत्रामध्ये ते बिल ऑफ एन्ट्री क्रमांक ३४५०४१९ व ३४५०४२० अन्वये २६८००.१८ मे. टन साठा एमव्ही नॉर्ड इलन या व्हेसलद्वारे आयात करणार असल्याचे कळविले असल्याचे सांगितले. दिनांक २४/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये एन शेड रे रोड येथील गोदामातुन ८८०० बाचक्यांमधील साठा स्थलांतरीत करणार असल्याचे व त्यापैकी ६३०० बाचके नमुद गोदामावर व २५०० बाचके शिवडी येथील गोदामात साठवणुक करणार असल्याचे कळविण्यात आल्याचे सांगीतले. दिनांक ०३/०७/२०१२ रोजीच्या माहे जुनच्या मासीक विवरणपत्राचे अवलोकन करता मे. जेठाभाई गोपालजीस या वेअरहाऊसमध्ये १६६७५ बाचके व मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये ६४०९७ बाचके असे मिळून एकूण ८०७७२ बाचके पिवळे वाटाणाचा साठा नमूद दोन्ही गोदामात साठवणूक असल्याचे नमुद आहे. तथापी, प्रत्यक्षात घटनास्थळी असलेल्या मे. जेठाभाई गोपालजीस या वेअरहाऊसमध्ये २१२ बाचके व मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये २५६७७ बाचके असे मिळून एकूण २५८८९ बाचके पिवळे वाटाणाचा साठा जप्त आहे. म्हणजेच मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित संचालक हे जप्त असलेल्या साठ्याबाबत काहीच भाष्य करीत नसून, ज्या शिपमेंटमधील साठ्याची विक्री पूर्ण झाली आहे, केवळ त्याचे तपशिल सादर करुन या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. या कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, सदरचा दोन्ही वेअरहाऊसमधील आयात केलेला साठा प्राप्त झाल्यानंतर विविध वेअरहाऊसमध्ये साठवणुक केला असून त्यापैकी, काही साठा विक्री करुन उर्वरीत शिल्लक साठा मुंबईतील विविध वेअरहाऊसेसमध्ये जागेच्या उपलब्धतेनुसार साठवणुक केल्याची बाब त्यांनी दिनांक २२/०६/२०११ व दिनांक २४/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये उपनियंत्रक शिधावाटप यांना अवगत केल्याचे सांगीतले. दिनांक ०२/११/२०११ आणि २४/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये उपनियंत्रक शिधावाटप यांना कळविण्यात आले असुन त्यामध्ये गोदरेज जेठाभाई गोपालजी वेअरहाऊस आणि इतर वेअरहाऊसमधील साठवणुकीचे तपशिल सादर केल्याचे सांगीतले आहे. मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. या कंपनीचा आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगून सदर साठ्याची नियमीतपणे विक्री करुन सद्य:स्थितीत नमुद गोदामावर त्यापैकीच शिल्लक असलेला साठा हा जप्त करण्यात आलेला असल्याचे सांगीतले आहे. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन नमुद दोन्ही वेअरहाऊसमध्ये जप्त असलेला पिवळा वाटाणा या कडधान्याचा साठा हा वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांनी सादर केलेल्या निवेदनासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांनी माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केलेला ५००० मे. टन पिवळे वाटाणाचा साठा हा मुंबई मधील विविध गोदामात साठवणुक केल्याचे व मे. केअरटेकर्स या गोदामात साठवणुक केलेला साठा हा आयात केल्यापैकीच असल्याचे नमुद करुन सदर साठा त्यांनी सदर गोदामात हा इतर ठिकाणी असलेल्या गोदामातुन स्थलांतरीत केल्याचे नमुद केले आहे. तथापी, माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केलेला साठा हा इतर गोदामात सुमारे ७ महिने साठवणुक असलेला साठा हा माहे जुलै २०१२ मध्ये मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये साठवणुक करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत साशंकता आहे. मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचा मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये ४०८० बाचकी पिवळे वाटाणाचा साठा सिलबंद आहे. नमूद कंपनीचे व्यवस्थापक यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीने मे. गोदरेज इंडस्ट्रिज लि. वडाळा पूर्व, मुंबई-३७ येथील गोदामात ४०८० बाचक्यांमधील पिवळया वाटाण्याच्या साठयाबाबत त्यांनी सीडब्ल्युसी वेअरहाऊस येथून ६००० बाचक्यांमधील साठा हा मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये माहे जुन २०१२ या महिन्यात स्थलांतरीत केले असल्याचे नमूद केले आहे. मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. यांनी सादर केलेल्या निवेदनासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांनी माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केलेला ५००० मे. टन पिवळे वाटाणाचा साठा हा मुंबई मधील विविध गोदामात साठवणुक केल्याचे दिसून येते. तथापी, माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केलेला साठा हा इतर गोदामात सुमारे ७ महिने साठवणुक असलेला साठा हा माहे जुलै २०१२ मध्ये मे. केअरटेकर्स या वेअरहाऊसमध्ये साठवणुक

CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत त्यांनी काहीच भाष्य केले नाही. ही आश्चर्यजनक बाब आहे. तथापी, मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचा आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगून सदर साठ्याची नियमीतपणे विक्री करुन सद्य:स्थितीत नमुद गोदामावर त्यापैकीच शिल्लक असलेला साठा हा जप्त करण्यात आलेला असल्याचे सांगीतले आहे. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मे. केअरटेकस या वेअरहाऊसमध्ये जप्त असलेला पिवळा वाटाणा या कडधान्याचा साठा हा वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

प्रस्तूत प्रकरणी, उपरोक्त तिन्ही कंपन्यांनी प्रचलित पध्दतीनुसार नियमीतपणे सुचनापत्राद्वारे अथवा नियतकालीक मासिक विवरणपत्राद्वारे आयात साठ्याबाबत परिपूर्ण लेखाजोखा सादर केला असता तर सदर प्रकरणी शासनाच्या बहूमुल्य वेळेचा सहजरित्या कालापव्यय टाळता येणे शक्य होते. तसेच सदर कंपन्यांनी आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगून सदर साठ्याची नियमीतपणे विक्री करुन सद्य:स्थितीत नमुद गोदामावर त्यापैकीच शिल्लक असलेला साठा हा जप्त करण्यात आलेला असल्याचे सांगीतले आहे. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन नमुद दोन्ही वेअरहाऊसमध्ये जप्त असलेला पिवळा वाटाणा या कडधान्याचा साठा हा वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सबब, मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लिं., मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. व मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपन्यांचा जप्त करण्यात आलेला पिवळे वाटाणा या कडधान्यांचा साठा हा पुढील काळात नियमीतपणे मासिक विवरणपत्र सादर करण्याच्या अटीस अधिन राहून बंधपत्र घेऊन मुक्त करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त/सिल करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि. या कंपनीचा नमुद दोन्ही वेअरहाऊस मधील पिवळा वाटाणा या कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना बंधपत्र घेऊन परत करण्यात यावा.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

२) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. या कंपनीचा नमुद दोन्ही वेअरहाऊस मधील पिवळा वाटाणा या कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना बंधपत्र घेऊन परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. या कंपनीचा नमुद दोन्ही वेअरहाऊस मधील पिवळा वाटाणा या कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना बंधपत्र घेऊन परत करण्यात यावा.

४) केंद्र शासनाच्या अधिसुचनाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांनुसार तसेच दिनांक २० मे, २००८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार आयातदारांनी आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. ॲग्रीकोअर कमोडीटीज प्रा. लि.चे संचालक
२) मे. ग्लेनकोअर ग्रेन इंडिया प्रा. लि. चे संचालक
३) मे. रिका ग्लोबल इंम्पेक्स लि. चे व्यवस्थापक/संचालक
४) मे. जेठाभाई गोपालजीस या वेअरहाऊसचे मालक/व्यवस्थापक
५) मे. केअरटेकस या वेअरहाऊसचे मालक/व्यवस्थापक
(उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, [illegible] प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.